RNI No. MAHBIL/2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ४, अंक ९] सोमवार, फेब्रुवारी २६, २०१८ / फाल्गुन ७, शके १९३९ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १२.००

**असाधारण क्रमांक १०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई ४०० ०१०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा, २०१५.**

क्रमांक एमआरपीएस/एएमडी-२०१८/१ए/प्रशासन-८.— शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकीर्ण.२०१५/प्र.क्र.३६०/प्रशासन-१, दिनांक १४/०९/२०१५ च्या परिच्छेद ३ सह महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा, २०१५ (सन २०१५ चा महा.३१) च्या कलम ३ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, याद्वारे या अधिसूचनेस जोडलेल्या अनुसूचीतील स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या सेवा, स्तंभ (३) विहित केलेली समय मर्यादा, स्तंभ (४) मध्ये नमूद अर्जाचा विहित नमुना, स्तंभ (५) मध्ये नमूद पदनिर्देशित अधिकारी आणि स्तंभ (६) व (७) मध्ये अनुक्रमे नमूद प्रथम आणि द्वितीय प्राधिकारी अधिसूचित करीत आहे, म्हणजेच—

**अनुसूची**

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस) | अर्जाचा विहित नमुना व असल्यास शुल्क | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| (१) | ई-नोंदणी | | | | | |
| | (१) इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन नोंदणी अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे. | सेवा तात्काळ (२४*७) | इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन नोंदणी अर्जाचा नमुना विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. | विक्रीकर अधिकारी नोंदणी | नोंदणी अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही. | नोंदणी अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही. |
| | (२) नोंदणी अर्ज स्वीकारणे | सेवा तात्काळ (२४*७) परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्ज विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर | (अ) मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत रुपये ५०० इतके ई-शुल्क (उलाढालीची विहित मर्यादा पूर्ण केलेल्या | विक्रीकर अधिकारी, नोंदणी | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच विभागाच्या संकेतस्थळावर | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच विभागाच्या संकेतस्थळावर |

## अनुसूची

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | इलेक्ट्रॉनिकली स्वीकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते. | प्रकरणात), केंद्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत रुपये २५ इतके ई-शुल्क, मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत स्वेच्छा नोंदणीसाठी रुपये ५००० इतके ई-शुल्क<br>(ब) सुरक्षा ठेव रुपये २५००० इतके ई-शुल्क (मूल्यवर्धित कर कायद्यांतर्गत स्वेच्छा नोंदणीसाठी). | | स्वीकारले जातात. उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही. | स्वीकारले जातात. उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही. |
| | (३) नोंदणी अर्ज सर्व दृष्टीने परिपूर्ण असेल तर नोंदणी दाखला क्रमांक देणेबाबत. | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त नोंदणी अर्ज असल्यास तपासणीअंती ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (तपासणी कालावधी धरून) नोंदणी दाखला क्रमांक दिला जाईल. नोंदणी क्रमांक नाकारला तर कारणासह अर्जदारास याबाबत ७ कामकाजाच्या दिवसात ई-मेल द्वारे कळविण्यात येते. | निःशुल्क | विक्रीकर अधिकारी, नोंदणी | अर्ज परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त असल्यास System Generated नोंदणी क्रमांक विहित मुदतीत निर्माण केला जातो. त्यामुळे त्याविरुद्ध अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखित कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी |
| **(२) ई -केंद्रिय विक्रीकर वैधानिक नमुने** | | | | | | |
| | (१) केंद्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत वैधानिक ई-नमुने मिळण्यासाठीच्या अर्जाचे नमुने विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करणे. | सेवा तात्काळ (२४*७) | निःशुल्क | विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष | रकाना (२) मध्ये उल्लेखित अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही. | रकाना (२) मध्ये उल्लेखित अर्ज विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने अपिलाची आवश्यकता नाही. |
| | (२) केंद्रिय विक्रीकर कायद्यांतर्गत वैधानिक ई-नमुन्यांच्या पुरवठ्यासाठी आवश्यक असलेल्या अर्जाचा स्वीकार करणे व पोचपावती देणे. | सेवा तात्काळ (२४*७). परिपूर्ण, वैध, तपासलेला आणि चुकांमुक्त अर्ज विभागाच्या www.mahavat. gov.in या संकेतस्थळावर इलेक्ट्रॉनिकली स्वीकारण्यात येऊन तात्काळ पोचपावती देण्यात येते. | निःशुल्क | विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच फक्त विभागाच्या संकेतस्थळावर स्वीकारले जातात. त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज सिस्टिम कडून स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही. | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्जच फक्त विभागाच्या संकेतस्थळावर स्वीकारले जातात. त्यामुळे उपरोक्त अटीत न बसणारे अर्ज सिस्टिम कडून स्वीकारले जात नाहीत. त्यामुळे अपिलाची आवश्यकता नाही. |

अनुसूची

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| | (३) व्यापाऱ्यास त्यांच्या ई-मेल वरती Digital Signature केलेले वैधानिक नमुने उपरोक्त २(२) नुसार केलेल्या तपशिलाच्या अनुषंगाने उपलब्ध करून देणे. | परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त अर्ज असल्यास तपासणीअंती ७ कार्यालयीन कामकाजाच्या दिवसांत (तपासणी कालावधी धरून) विभागातर्फे व्यापाऱ्याच्या नोंदीत ई-मेल आय.डी. वर पाठविण्यात येतील. | निःशुल्क | विक्रीकर अधिकारी, मध्यवर्ती भांडार कक्ष | अर्ज परिपूर्ण, वैध आणि चुकांमुक्त असल्यास System Generated Digitally Signature केलेले वैधानिक नमुने विहित मुदतीत अपलोड केले जातात. त्याविरुद्ध अपिलाची आवश्यकता नाही. मात्र सेवा उल्लेखित कालावधीत प्राप्त झाली नाही तर पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. |
| (३) ई-विवरणे | | | | | | |
| | (१) महाराष्ट्र मूल्यवर्धित कर कायदा, २००२ व केंद्रीय विक्रीकर कायदा, १९५६ अंतर्गत ई- विवरण पत्रांचे नमुने विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करणे. | सेवा तात्काळ (२४*७) | निःशुल्क | ह्या सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी विभागाच्या helpdesk@mahavat.gov.in या मदतकक्षाच्या ई-मेल वर तक्रार नोंदवू शकतात. तदनंतर पदनिर्देशित अधिकारी (विक्रीकर उप आयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर अधिकारी) यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते. | पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. |
| | (२) विभागाच्या www.mahavat.gov.in या संकेतस्थळावर दाखल झालेल्या ई-विवरणपत्रांची स्वीकृती पश्चात पोचपावती उपलब्ध करणे. | ई-विवरण अपलोड झाल्यानंतर लगेच. | (१) विहित वेळेत ई-विवरणपत्र दाखल केल्यास निःशुल्क.<br>(२) ई-विवरणपत्र विहित कालावधी पासून १ महिन्याच्या आत दाखल केल्यास रुपये १००० एवढे शुल्क लागू आहे.<br>(३) विहित मुदतीपासून १ महिन्यानंतर ई-विवरणपत्र दाखल केल्यास रुपये ५००० एवढे शुल्क लागू आहे. | परिपूर्ण, वैध व चुकांमुक्त असलेलीच विवरणपत्रे विभागाच्या संकेतस्थळावर अपलोड केली जातात. ह्या सेवेत काही अडचणी आल्यास व्यापारी विभागाच्या helpdesk@mahavat.gov.in या मदतकक्षाच्या ई-मेल वर तक्रार नोंदवू शकतात. तदनंतर पदनिर्देशित अधिकारी (विक्रीकर उप आयुक्त, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर अधिकारी) यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते. | पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी. |

## अनुसूची

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| **(४) ई-करभरणा** | | | | | | |
| | (१) महाराष्ट्र कोषागार नियम ६ नुसार चलनाचा नमुना व्यापारी त्याचा लॉग इन आय डी व पासवर्ड वापरून विभागाच्या www.mahavat.gov.in संकेतस्थळावर भरणे व e-Payment करणे. | सेवा तात्काळ (२४*७) | निःशुल्क | व्यापाऱ्याला ह्या सेवेत काही अडचण आल्यास मदतकक्षाच्या ई-मेलवर helpdesk@mahavat.gov.in तक्रार नोंदविण्यात येते. तक्रारींचे निवारण प्रकरणांच्यानुसार खालील अधिकाऱ्यांमार्फत जाते. (१) विवरण व वसुली शाखा ह्या शाखेत काम अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त. (२) नवीन नोंदणी पाठपुरावा शाखेत काम करणारे विक्रीकर अधिकारी व सहाय्यक विक्रीकर आयुक्त. (३) करदाते शाखेत काम करणारे अधिकारी विक्रीकर आयुक्त, विक्रीकर अधिकारी यांचे मार्फत तक्रारींचे निवारण केले जाते. | पदनिर्देशित अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकाऱ्याचा नियंत्रक अधिकारी |

राजीव जलोटा,
विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

मुंबई,
दिनांक २६ फेब्रुवारी २०१८.